दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | बुधवार ८ ऑक्टोबर २०२५ | अंक २८६ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

आजचा दिनविशेष
१९३२ : इंडियन एअर फोर्स अ‍ॅक्ट द्वारे भारतीय वायूदलाची स्थापना झाली.

SUN Tourism INTERNATIONAL PVT. LTD. Since 2007
All TOURS घर से घर तक दिल से दिल तक
www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555

# झोपडपट्टी ते तुकडाबंदी, मंत्रिमंडळ बैठकीत सर्वात मोठे ९ निर्णय, राज्याचा चेहरा बदलणार!

### पिकांसाठी 10 हजार अतिरिक्त,3 हेक्टर पर्यंत मर्यादा वाढवली

आपत्तीत कोरडवाहू जमिनीला एनडीआरएफच्या निकषानुसार हेक्टरी साडेआठ हजार हजार मदत दिली जाते. परंतु सरसकट सर्व शेतक-यांना रब्बी साठी १० हजार अतिरिक्त मदत दिली जाईल. त्यामुळे कोरडवाहू शेतीसाठी साडे अठरा हजार, हंगामी बागायती शेतीला हेक्टरी २७ हजार रुपये, तर बागायती शेतीला हेक्टरी ३२ हजार रुपये नुकसान भरपाई मिळेल. या व्यतिरिक्त ज्या शेतक-यांनी विमा घेतला आहे. त्यांना अंदाजे हेक्टरी १७ हजार रुपये मदत मिळेल असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. ४५ लाख शेतक-यांचा विमा उतरवला आहे. ज्याची जमीन खरडून गेली आहे अशा शेतक-यांना हेक्टरी ४७ हजार रुपये नुकसान भरपाई आणि नरेगाच्या माध्यमातून हेक्टरी ३ लाख रुपये देण्यात येतील.

राज्य मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत राज्य सरकारने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. विशेष म्हणजे या बैठकीत दोन मोठे निर्णय घेण्यात आले आहेत. यातील पहिला निर्णय हा तुकडा बंदीबाबत आहेत. या निर्णयानुसार तुकडा बंदी अधिनियमात सुधारणा करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे आता महाराष्ट्रातील छोट्या प्लॉट धारकांना शासनाचा मोठा दिलासा मिळणार आहे. दुसरा निर्णय हा झोपडपट्टी पुनर्वसनासंदर्भात आहेत. या निर्णयानुसार एसआरएमध्ये क्लस्टर योजना राबविण्यासाठी मंजुरी देण्यात आली आहे. या दोन प्रमुख निर्णयांसह इतरही काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. उद्योग विभाग

महाराष्ट्र राज्याचे रत्ने व दागिने धोरण

मंत्रिमंडळ बैठकीत सर्वात मोठे 9 निर्णय!




– २०२५ जाहीर करण्यात आले आहे. सोने, चांदीचे दागिने,हिरे-रत्ने यांच्याशी निगडीत उद्योग-व्यवसाय वाढीस चालना मिळणार आहे. एक लाख कोटीं रुपयांची गुंतवणूक, पाच लाख नवीन रोजगार निर्मितेच उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे.

नगर विकास विभाग

राज्यातील नागरी भागातील सांडपाण्यावरील प्रक्रियेच्या धोरणास मंजुरी देण्यात आली आहे. सांडपाण्यावरील प्रक्रीयेमुळे आणि त्याच्या पुनर्वापराव्दारे चक्रीय अर्थव्यवस्थेस (सर्क्युलर ईकॉनॉमी)ला चालना मिळणार आहे. सांडपाण्याचे शाश्वत व्यवस्थापन, पर्यावरण रक्षण, आरोग्यदायी परिसर या संकल्पनेला बळ मिळणार आहे. राज्यातील ४२४ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये धोरण राबविण्यात येणार आहे.महसूल विभाग तुकडे बंदी अधिनियमात सुधारणा करण्यास मान्यता देण्या ताली आहे. महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. अधिनियमातील कलम ८ (ब) चे परंतुक वगळून कलम ९ मध्ये पोट-कलम (३) नंतर परंतुक समाविष्ट करण्यात येणार आहे.

# ढाळेवाडीच्या प्रितम हुलेची राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड



बीड प्रतिनिधी :- पाटोदा तालुक्यातील ढाळेवाडी येथील प्रीतम शामराव हुले हिने नुकतीच संभाजीनगर येथे आयोजित झालेल्या कुस्ती स्पर्धेत 14 वर्षाखालील 36 किलो वजनी गटात विजय मिळवून राज्यस्तरीय निवडीस पात्र ठरली. प्रीतमच्या यशामागे सातत्यपूर्ण मेहनत, चिकाटी आणि कुस्तीतील कौशल्य आहे. स्पर्धेत तिने आपली ताकद, तंत्र, चपळाई आणि मानसिक सक्षमता सिद्ध केली. तिच्या या यशामुळे पाटोदा तालुक्यातील खेळ क्षेत्रात नवीन उत्साह निर्माण झाला आहे.संभाजी नगर येथे झालेल्या स्पर्धेत राज्यातील अनेक खेळाडू सहभागी झाले होते. प्रितमने आपले वर्चस्व कायम ठेवत आपल्या वजन गटातील सर्व प्रतिस्पर्ध्यांना पराभूत केले. प्रशिक्षकांनी तिच्या तयारीला, चिकाटीला आणि खेळातील शिस्तीला अभिनंदन केले आहे.सातत्यपूर्ण मेहनत आणि चिकाटीमुळे प्रितम विजेतेपद मिळवू शकली. स्थानिक खेळ मंडळ आणि कुटुंबीयांनी तिला पुढील राज्यस्तरीय स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. तिच्या यशामुळे पाटोदा तालुक्यातील मुलींमध्ये कुस्तीसारख्या खेळांमध्ये सहभाग वाढण्याची प्रेरणा मिळाली.प्रितम पुढील राज्यस्तरीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करेल अशी सर्वांनी अपेक्षा व्यक्त केली आहे.प्रीतमच्या या यशामुळे स्थानिक खेळाडू, कुटुंबीय आणि नागरिक अत्यंत आनंदित आहेत. तिच्या मेहनतीने आणि चिकाटीने एक आदर्श तयार झाला आहे, ज्यातून इतर मुलींनाही खेळामध्ये सहभागी होण्याची प्रेरणा मिळाली आहे.अभिनंदन प्रितम! तुझ्या मेहनतीला आणि जिद्दीला सलाम! पुढील स्पर्धांमध्येही तु महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल कराल अशी सर्वांनी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# मराठा समाजाला मोठा दिलासा; मुंबई हायकोर्टाचा मराठा-कुणबी GRला अंतरिम स्थगिती देण्यास नकार

मराठा-कुणबी आरक्षणासंदर्भातील जीआरविरोधात याचिकांमध्ये राज्य सरकारला मोठा दिलासा मिळाला. मुंबई उच्च न्यायालयाने GR ला अंतरिम स्थगिती देण्यास नकार दिला. 2 सप्टेंबर 2025 रोजीच्या अध्यादेशाला अंतरिम स्थगिती देण्यास कोर्टाने नकार दिला. इतर मागासवर्गीय (OBC) प्रवर्गातंर्गत मराठा आरक्षण देण्याच्या अध्यादेशाला विरोध करणाऱ्या आणि समर्थनार्थ हायकोर्टात याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. त्यावर आज सुनावणी झाली असता राज्य सरकारला तुर्तास दिलासा मिळाला आहे. 2 सप्टेंबर रोजीच्या अध्यादेशामुळे मराठ्यांना ओबीसी कोट्याचा लाभ मिळेल. त्यामुळे ओबीसी कोट्यातील सध्याचे आरक्षण कमी होईल. इतर मागास प्रवर्गाचे मोठे नुकसान होईल. तर सरकारच्या या अध्यादेशामुळे राज्यात आतापर्यंत 7 जणांनी आत्महत्या केल्याने याचिकांवर तातडीने सुनावणी घेण्याची मागणी करण्यात आली होती. थोड्यावेळीपूर्वी काही याचिकांमधील तांत्रिक त्रुटी दूर करण्याचे निर्देश दिल्यानंतर हायकोर्टाने जीआरला अंतरिम स्थगिती देण्यास आज नकार दिला. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईतील बेमुदत उपोषणानंतर राज्य सरकारने 2 सप्टेंबर 2025 रोजी मराठा-कुणबी आरक्षण अध्यादेश (GR) काढला. त्यानुसार, मराठवाड्यातील मराठा समाजाला हैदराबाद गॅझेटियरच्या नोंदींवर आधारीत कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया निश्चित करण्यात आली. त्यासाठी जिल्हा स्तरावर समित्या स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू ही झाली आहे. मराठा बांधवांकडून कुणबी दाखल्यासाठीचे अर्जही स्वीकारण्यात येत आहे. तर अजितदादांनी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या निमित्ताने काही मराठा बांधवांना कुणबी दाखला दिला होता. अर्जाची आणि कागदपत्रांची छाननी केल्याशिवाय कुणबी प्रमाणपत्र न देण्याची ताकीद देण्यात आलेली आहे. तर दुसरीकडे सातारा गॅझेटिअर, औंध आणि कोल्हापूर गॅझेटियर सुद्धा ग्राह्य धरण्यात येणार आहे.

# महायुती सरकारने फसवे पॅकेज जाहीर करताना शेतकऱ्यांची थट्टा केली. हंबरडा मोर्चात जाब विचारणार अंबादास दानवे.

बीड –(प्रतिनिधी) मराठवाड्यात अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे शेती, पिकांचे, अतोनात नुकसान झाले असून त्यांच्यावर आसमानी सुलमानी संकट ओढवले आहे. अशा संकटावेळी तीन पक्षाचे महायुती सरकार गेंड्याची कातडी पांघरून शांत बसलेले आहे. सत्ताधाऱ्यांना झोपेतून जागे करण्यासाठी व शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये मदत मिळाली पाहिजे, शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमुक्ती मिळाली पाहिजे या मागण्याकरिता संभाजीनगर येथे शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे साहेबांच्या नेतृत्वाखाली हंबरडा मोर्चाचे आयोजन करण्यात आले. असून या मोर्चात हजारच्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान बीड येथील शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत केले.

पुढे बोलताना अंबादासजी दानवे यांनी म्हटले की आज मुख्यमंत्र्यांनी फसवे पॅकेज जाहीर करताना शेतकऱ्यांच्या तोंडाला पाणी पुसले ६० लाख शेतकऱ्यांसाठी निकषाच्या पलीकडे जात फक्त ६ हजार कोटी सोडले आहे. ज्यांची जमिनीतील माती खरडून गेली आहे त्यांना हेक्टरी ४७ हजार रुपये व मनरेगा तून ३ लाख रुपये देऊ असे जाहीर केले म नरेगाचे आधीच्याच कामाचे पैसे हे सरकार अजून पर्यंत देऊ शकले नाहीत. या कामाचे कधी पैसे देणार हा प्रश्न आहे शेतकऱ्यांच्या नुकसानीचा विचार केला तर ही मदत पुरेशी नसून त्यांना तात्काळ मदत ती सोबत कर्जमुक्ती मिळाली पाहिजे.



एका शेतकऱ्याला शेतात काळ टाकायचा असेल जमिनीची लेवल करायची असेल तर त्यासाठी आधी मनरेगा कार्यालयाकडे अर्ज सादर करावा लागेल मग कामानुसार मजूर ठरणार मग मजुरांना पैसे देणार हे फक्त मुख्यमंत्र्यांना वेळ काढून धोरण अवलंबिले आहे.

यावेळी बोलताना संपर्कप्रमुख परशुराम जाधव म्हणाले की मराठवाड्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना कर्ज माफी मिळाली पाहिजे या म ागणीसाठी स्वत: उद्धव साहेब ठाकरे मैदानात उतरले असून आपण सर्वांनी जास्तीत जास्त संख्येने हंबरडा मोर्चा सहभागी व्हावे.

यावेळी जिल्हाप्रमुख उल्हास गिराम गणेश वरेकर यांनी मनोगत व्यक्त केले व जास्तीत जास्त संख्येने मोर्चात उपस्थिती लावू असा विश्वास दिला या बैठकीचे सूत्रसंचालन गोरख सिंघन यांनी केले तर आभार प्रदर्शन विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे यांनी केले.

या बैठकीस शिवसेना संपर्क प्रमुख परशुराम जाधव, जिल्हाप्रमुख उल्हास गिराम, गणेश वरेकर माजी जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे , परमेश्वर सातपुते, शिवसेना प्रवक्ते गणेश जाधव ,जिल्हा संघटक भाई संजय महाद्वार, उपजिल्हाप्रमुख रामराजे साळुंखे आजिनाथ खेडकर ,राजूभाऊ महुवाले, आशिष मस्के ,हनुमान जगताप, जिल्हा संघटक नितीन धांडे महिला संघटक मीराताई नवले प्रमिलाताई म ाळी,तालुकाप्रमुख अजय दाभाडे सुभाष राऊत मुकुंद शिंदे विनायक मुळे सोपान काका मोरे

अशोक जाधव श्रीधर गरड भोजराज पालीवाले लक्ष्मण सोळुंके अशोक गाढवे रवि वाघमारे नामदेव सोळंके संजय शिंदे हरिभाऊ खेडेकर राजेश कोकणे उपस्थित होते.

# टीईटी परीक्षे बाबत पुनर्विचार याचिका दाखल करावी!

### अखील भारतीय माध्यमिक शिक्षक संघाची पंतप्रधान व राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेकडे मागणी!

नवी दिल्ली: सर्व कार्यरत शिक्षकांना टीईटी परीक्षा अनिवार्य करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने देशातील शिक्षण विभागात गोंधळाची परिस्थिती निर्माण झालेली आहे. संभ्रम दूर करण्यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी आणि राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करावी अशी मागणी अखील भारतीय माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष इंद्रशेखर मिश्रा व सरचिटणीस जी. सदानंद गौड यांनी पंतप्रधान व राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेचे सदस्य सचिव यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम यांनी याबाबत दिलेल्या प्रसिध्दीपत्रकात म्हटले आहे की, देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने देशातील कार्यरत सर्व शिक्षकांना टीईटी परीक्षा बंधनकारक करण्याचा निर्णय दिला आहे. त्यामुळे देशातील शिक्षण क्षेत्रात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. देशातील सुमारे चाळीस लाख शिक्षक यामुळे प्रभावित होत असल्याने देशाच्या शिक्षण क्षेत्रातील गोंधळ आणि संभ्रम दूर करण्यासाठी केंद्र सरकारने पुनर्विचार याचिका दाखल करण्याची मागणी अखील भारतीय माध्यमिक शिक्षक संघाने केली आहे. निवेदनात म्हटले आहे की आरटीई नुसार पहिली ते आठवी पर्यंतच्या शिक्षकांना शैक्षणिक व व्यावसायिक पात्रते बरोबरच टीईटी अनिवार्य करण्यात आली आहे. मात्र 23 ऑक्टोबर 2010 पूर्वी सेवेत आलेल्या शिक्षकांना टीईटी मधुन सुट देण्यात आलेली आहे. पूर्वी सेवेत आलेले शिक्षक तेंव्हा आवश्यक असलेले निकष पूर्ण करूनच सेवेत आले असल्याने त्यांना सुट देण्यात आली आहे. ज्यांच्या नियुक्त्या 23 ऑक्टोबर 2010 नंतर झाल्या त्यांना 31 मार्च 2015 पर्यंत टीईटी उत्तीर्ण होणे आवश्यक होते. त्याबाबत केंद्र सरकारने 03 ऑगस्ट 2017 रोजी अप्रशिक्षित शिक्षकांनी प्रशिक्षित होणे, आरटीई नियमात सुट घेऊन नियुक्त्या घेतलेल्यांनी टीईटी उत्तीर्ण करणे याबाबत तो आदेश काढण्यात आला होता,परंतु यावर निर्णय देताना मा सर्वोच्च न्यायालयाने पाच वर्षे वा त्यापेक्षा कमी सेवा राहिलेले शिक्षक वगळता देशातील सर्व शिक्षकांना टीईटी अनिवार्य केली आहे. प्रचलित कायदे, आरटीई मधील तरतुदी विचारात घेऊन 23 ऑक्टोबर 2010 पूर्वी नियुक्त शिक्षकांना टीईटी मधुन वगळणे गरजेचे आहे. दोन वर्षां टीईटी न केल्यास सेवामुक्त करण्याचे आदेश मा सर्वोच्च न्यायालयाने दिला असल्याने देशातील शिक्षण क्षेत्रातील गोंधळाची परिस्थिती निर्माण झालेली आहे.

# केज न्यायालय इमारतीच्या दुसऱ्या मजल्याला मंजुरी



केज–प्रतिनिधी वाढत्या कामकाजामुळे जागा अपुऱ्या पडत असलेल्या के ज येथील न्यायालयीन इमारतीवर दुसरा मजला बांधण्यासाठी अखेर शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. जागेअभावी उद्भवणाऱ्या अडचणी लक्षात घेता या कामासाठी आ. नमिता मु ंदडा यांनी सातत्याने शासनस्तरावर पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळत आज शासन निर्णय निर्गमित झाला आहे. महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागाकडून सोमवारी (६ ऑक्टोबर) जारी करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार, या कामासाठी तब्बल रु. ७ कोटी ७६ लाख ५० हजार इतका खर्च मंजूर करण्यात आला आहे. आ. नमिता मु ंदडा यांनी के ज न्यायालय परिसराच्या विस्ताराची गरज वेळोवेळी शासनाच्या निदर्शनास आणून दिली होती. न्यायालयीन कामकाज वाढल्याने विद्यमान जागा अपुरी ठरत असल्याचे त्यांनी अनेक बैठकीत मांडले होते. त्यानंतर केज येथील अस्तित्वात असलेल्या न्यायालयीन इमारतीवर अतिरिक्त मजला बांधकामाचे प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला. शासनाने आता या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता दिली आहे. हे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्याखाली पार पडणार आहे. या मंजुरीमुळे केज तालुक्यातील न्यायालयीन पायाभूत सुविधा सुधारणार असून अधिक सुविधा आणि सुयोग्य जागा उपलब्ध होणार आहे. यासाठी मुख्यमंत्री तथा विधी व न्यायमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री पंकजाताई मु ंडे यांचे आ. नमिता मु ंदडा यांनी आभार मानले आहेत.

# खा.बजरंग सोनवणे मुंबईवरून आले असे कपिलधार वाडीत गेले; जमिनीला पडलेल्या भेगांची केली पाहणी

### स्थलांतरित ग्रामस्थांशी संवाद साधत दिला धीर ; तातडीने सर्वेक्षण करण्याबाबत तहसीलदारसोबत चर्चा

बीड: बीड तालुक्यातील पाली ग्रामपंचायत हद्दीतील कपिलधारवाडी परिसरात जमिनीतील भेगा व जमीन खचणे असे प्रकार घडल्याने नागरिक भयभीत आहेत. या गंभीर भूगर्भीय परिस्थितीवर तातडीने वैज्ञानिक भूगर्भ सर्वेक्षण करण्यात यावे, असे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी महानिदेशक, भारतीय भूगर्भ सर्वेक्षण (GSI), भारत सरकार, नवी दिल्ली यांना दिलेले आहे. दरम्यान, दि.७ रोजी खा.बजरंग सोनवणे हे मुंबईवरून बीड जिल्ह्यात दाखल झाले. आल्या आल्या त्यांनी केजला न जाता कपिलधारवाडीत जात भेगांची पाहणी केली. कपिलधारवाडी गाव व त्याच्या परिसरात (पाली ग्रामपंचायत) गेल्या काही दिवसांपासून अत्यंत गंभीर भूगर्भीय स्थिती निर्माण झालेली आहे. अलीकडच्या काही दिवसांत या परिसरात जमिनीत मोठ्या भेगा पडल्याचे दिसून आले असून त्या झपाट्याने वाढत आहेत. अनेक



ठिकाणी जमीन खचल्याचेही स्पष्ट दिसते. त्यामुळे परिस्थिती अत्यंत गंभीर बनली असून स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतजमिनी, घरं, सार्वजनिक रस्ते इत्यादींना संभाव्य धोका निर्माण झाला आहे. या घडामोडींच्या स्वरूपावरून हे स्पष्ट होते की या भागात अनपेक्षित व धोकादायक भूगर्भीय बदल होत आहेत. या परिस्थितीच्या गांभीर्याचा तातडीने विचार करून भारतीय भूगर्भ सर्वेक्षण विभागाने (GSI) केंद्रातील तज्ञांची टीम तातडीने पाठवून कपिलधारवाडी परिसर व आजूबाजूच्या भागाचा सखोल भूगर्भीय व भू-तांत्रिक सर्वेक्षण करावे, असे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी संबंधित विभागाला दिले आहे. दरम्यान, खा.बजरंग सोनवणे विकास कामाच्या निमित्ताने दोन दिवस मुंबईत होते. ते मंगळवारी सायंकाळी बीड जिल्ह्यात दाखल झाले. जिल्ह्यात आल्यानंतर ते थेट कपिलधारवाडीत गेले. गावात पडलेल्या भेगा आणि पडझडीची पाहणी केली. त्याठिकाणी गावातील नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर केलेले असून त्याठिकाणी महिला भगिनीची भेट घेतली. ग्रामस्थांशी संवाद साधत त्याना धीर दिला. आपण उपाय योजनासाठी पत्रव्यवहार करत आहोत. तुम्ही काळजी करू नका, मी तुमच्यासोबत आहे, असा विश्वासही दिला. यावेळी बीडचे तहसीलदार सोबत होते.

...

### भूगर्भ सर्वेक्षण विभागाकडे अशी मागणी

सर्वेक्षणाद्वारे भूस्खलन व भेगा पडण्यामागील शास्त्रीय कारणे शोधावीत व तात्काळ प्रतिबंधक व सुधारात्मक उपाय सुचवावेत. आवश्यक असल्यास पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय तसेच राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (NDMA) यांच्याशी समन्वय साधून बाधित क्षेत्रातील सुरक्षिततेची खात्री करावी आणि पुढील मानवी व पर्यावरणीय हानी टाळावी. या विषयाचे आपत्तीजन्य व तातडीचे स्वरूप लक्षात घेऊन या प्रकरणास प्राधान्य देऊन आपल्या प्रादेशिक तसेच केंद्रीय विभागांतून तातडीने कार्यवाही करावी, असेही खा.बजरंग सोनवणे यांनी पत्रात म्हटले आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
बुधवार ८ ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



संपादकीय

## मुलांना कफ सिरप देण्यापूर्वी या गोष्टी लक्षात ठेवा; अन्यथा किडनी होऊ शकते निकामी



बदलत्या हवामानात मुलांना फ्लू आणि खोकल्यासारखे आजार होतात. लहान मुलांवर तर बदलत्या हवामानाच लगेच परणाम होतो. अशा वेळी खोकल्यासाठी लहान मुलांना शक्यतो कफ सिरप दिले जाते. पण सध्या यामुळे सर्व पालकांच्या मनात भीती बसली आहे. तथापि, राजस्थान आणि मध्य प्रदेशात कफ सिरपमुळे झालेल्या लहान मुलांच्या मृत्यूमुळे सगळ्याच पालकांमध्ये चिंता वाढली आहे.त्यामुळे आता केंद्र सरकारने काही कफ सिरपवर बंदी घालण्यास सांगितली आहे.
उत्तराखंडचे औषध नियंत्रक यांनी सांगितले की, केंद्र सरकारने बंदी घातलेल्या मुलांच्या कफ सिरपमध्ये डेक्स्ट्रोमेथोर्फन, फेनिलेफ्रिन, हायड्रोक्लोराइड आणि यापासून बनवलेले मिश्रण समाविष्ट आहे.वयाच्या या वर्षा खालील मुलांना कफ सिरप देऊ नये दोन वर्ष किंवा त्यापेक्षा कमी वयाच्या मुलांना कफ सिरप देऊ नये आणि चार वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांना कफ सिरप देताना काळजी घ्यावी यासाठी मार्गदर्शक तत्त्वे देखील जारी करण्यात आली आहेत. इतर राज्यांमध्ये कफ सिरपमुळे होणाऱ्या मुलांच्या मृत्यूमुळे जनतेत संताप निर्माण झाला आहे. आरोग्य विभागाचे पथक राज्यभरातील मेडिकल स्टोअर्स, औषध घाऊक विक्रेते आणि रुग्णालयातील फार्मसी स्टोअर्सची तपासणी करत आहेत.चूक कुठे होते?पण कफ सिरप देताना नेमकी चूक कुठे होते देखील समजणे गरजेचे आहे. कारण एवढ्या वर्षांपासून कफ सिरप लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत सगळेच पित आलेत मग चूक कुठे झाली ज्यामुळे अनेक लहानग्यांना आपला जीव गमवावा लागला. चला जाणून घेऊयात. मुलांना कफ सिरप देण्यापूर्वी कोणत्या गोष्टी लक्षात ठेवणे गरजेचं आहे. कोणत्या गोष्टी लक्षात ठेवणे गरजेचं आहे. तज्ज्ञांच्या मते कफ सिरपमध्ये डेक्सट्रोमेथोर्फनसारखे हानिकारक पदार्थ असतात, जे 5 वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांना देऊ नयेत. कफ सिरप बनवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या घटकांचा मुलांच्या हृदयावर आणि मूत्रपिंडांवर परिणाम होतो. म्हणून, असे सिरप 5 वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांना देऊ नयेत. तथापि, असे दिसून येते की एकतर योग्य डॉक्टर न मिळाल्यास असे परिणाम दिसून येतात किंवा मुलांनी लवकर बरे होण्यासाठी केमिस्टकडून स्वतः विकत घेतात, जे मुलांसाठी धोकादायक ठरू शकते.अन्यथा या अवयवांचे होऊ शकते नुकसान?त्यामुळे योग्य डॉक्टरांच्या किंवा बालरोगतज्ञांचा सल्ल्यानेच लहान मुलांना औषध द्या. तेसच मनाने जास्त केमिकलवालं सिरप जर एखाद्या खूपच लहान मुलालाल दिलं तर ते घेतल्यानंतर उलट्या, पोटदुखी आणि जुलाब यासारख्या समस्या उद्भवतात. मूत्रपिंडात क्रिस्टल्स तयार होतात, ज्यामुळे मूत्रपिंड निकामी होण्याचा धोका असतो.तसेच चुकीचे सिरप दिल्याने मेंदूलाही नुकसान होऊ शकते, जे प्राणघातक ठरू शकते. खोकल्याचे दोन प्रकार असतात कोरडा खोकला आणि ओला खोकला. दोन्हीसाठी वेगवेगळी औषधे आणि उपचार आहेत. त्यामुळे मनाने सिरप आणण्यापेक्षा सर्वात आधी योग्य डॉक्टरांची निवड करून त्यांच्याकडून मुलांची तपासणी करून घ्या आणि मगच औषध किंवा सिरप वैगरे घ्या.

## १२- ऑक्टोबर रोजी साहित्यरत्न डॉ.अण्णाभाऊ साठे साहित्य संमेलन

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट
नांदेड : स्वायत संस्था आर्टी आयोजित साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे साहित्य संमेलन १२ ऑक्टोबर २०२५ रोजी क्रांतिवीर लहुजी साळवे नगरी, डॉ. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह स्टेडियम परिसर नांदेड येथे आयोजित करण्यात आले आहे. हा कार्यक्रम एक दिवसिय असून सकाळी ७ वाजल्यापासून रात्री ९ वाजेपर्यंत विविध साहित्यिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली आज ७ ऑक्टोबर



२०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात पूर्व नियोजन बैठक संपन्न झाली. बैठकीत साहित्य संमेलनाच्या आयोजनाची सविस्तर माहिती जिल्हाधिकारी यांनी दिली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रत्येक विभागाला दिलेली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडावी असे निर्देश देण्यात आले. या बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, मनपाचे अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, पोलीस अधीक्षक कार्यालयाचे प्रतिनिधी अधिकारी, सहाय्यक आयुक्त समाजकल्याण कार्यालयाचे राठोड, समाजकल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार, साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष मारुती वाडेकर, निमंत्रक गणेश अण्णा तादलापूरकर, गंगाधर कावडे, यशपाल गवाले, नामदेव कांबळे, प्रेमानंद शिंदे, प्रा. देविदास इंगळे, शिवाजी नुरुंदे, प्रीतम गवाले, दयानंद बसवंते, भारत खडसे आदी उपस्थित होते.

## शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी कॉँग्रेसचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट
नांदेड : जिल्हा कॉँग्रेस कमिटीच्या वतीने खासदार रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये मदत करावी, ओला दुष्काळ जाहीर करावा, तसेच शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करावी या मागणी करिता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांना निवेदन देण्यात आले. जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. तातडीने ओला दुष्काळ जाहीर



करुन, हेक्टरी पन्नास हजार तात्काळ मदत द्या, पंचनाम्यानुसार अधिकची भरीव मदत द्यावी, शहरी भागातील पुरग्रस्तांना पंचवीस हजार मदत द्यावी या मागण्यांसाठी कॉँग्रेसच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. सरकारने बाधितांना दिलासा द्यावा अन्यथा शेतकऱ्यांचा महामोर्चा घेऊन रस्त्यावर उतरू असा इशारा खा. रवींद्र चव्हाण यांनी सरकारला दिला आहे.
यावेळी उपस्थित जिल्हाध्यक्ष माजी आमदार हनुमंतराव पाटील बेटमोगरेकर, जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, महानगर अध्यक्ष माजी महापौर अब्दुल सत्तार, यशपाल भिंगे, सुरेंद्र घोडसकर, श्रावण रेपनलवाड, रेखा चव्हाण, जयश्री पावडे, दिनेश निखाते, धनराज राठोड, तिरुपती कोंडेकर, शमीम अब्दुल्ला, महेश देशमुख, बालाजी चव्हाण, विठ्ठल पावडे, आनंद चव्हाण, अब्दुल गफार, मसूद खान, सतीश देशमुख, शेर अली, रहीम खान, करुणा जमदाडे, अझीझ कुरेशी, रमेश गोडबोले, मोहम्मद मुंतजीब, श्रीनिवास मोरे, मुन्ना अब्बास, अतुल पेद्दावाड, शंकर शिंदे, बालाजी गाडे, अंबादास रातोळे, सुरेश हटकर, सत्यपाल सावंत, महेश शिंदे, ज्योती कदम, प्रवीण कानगुले, राजू पाटील रावणगावकर, सुनील वानखेडे, प्रताप देशमुख, मधुकर दिघे आदींसह कॉँग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

## इंडियन कॉपीराईट प्रोटेक्शन व सहकर्म सामाजिक कल्याण फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२५सोहळा संपन्न!

कल्याण(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर) समाजसेवा, शिक्षण, कला आणि विविध सामाजिक क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना सन्मानित करण्यासाठी इंडियन कॉपीराइट प्रोटेक्शन व सहकर्म सामाजिक कल्याण फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय 'महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२५' सोहळा ठाणे जिल्ह्यातील कल्याण येथील अग्रवाल कॉलेज येथे दिनांक ५ ऑक्टोबर २०२५ रोजी थाटात संपन्न झाला. १३८ समाजसेवकांचा सन्मान करण्यात आला. या प्रतिष्ठित सोहळ्याचे आयोजन इंडियन कॉपीराइट प्रोटेक्शनचे मुख्य तपासी अधिकारी रामजीत उर्फ जितू गुप्ता आणि सहकर्म सामाजिक कल्याण फाउंडेशनच्या शितल पाटील यांनी केले होते. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांतून समाजसेवक, शिक्षक, कलावंत आणि विविध सामाजिक कार्यात कार्यरत असलेले मान्यवर या कार्यक्रमास उपस्थित होते. यावेळी, १३८ समाजसेवकांना त्यांच्या अतुलनीय योगदानाबद्दल आकर्षक ट्रॉफी आणि सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले.
दिग्गज मान्यवरांची उपस्थिती
पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी अनेक दिग्गज मान्यवरांची उपस्थिती लाभली. यामध्ये इंडियन आर्मीचे सुभेदार कॅप्टन महेंद्र गवई सर, एडिशनल कमिशनर जी.एस.टी पुणे साळुंखे सर, हिंदू रक्षक संदीप शर्मा सर, शकुंतला तायडे मॅडम, उद्योजिका सुमित्रा पाटील मॅडम, अभिनेत्री साक्षी नाईक, विजय



वाघेला सर, काजल सुर्वे मॅडम, समाजसेविका मेहरुजीम खान मॅडम, व डॉ. अनिता गुप्ता यांचा समावेश होता. या सर्व पाहुण्यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम या भव्य सोहळ्याला यशस्वी करण्यासाठी रामजीत गुप्ता, शितल पाटील, माणिक पाटील, तुकाराम पाटील, रवी वासवानी, राजकुमारी गुप्ता, शारदा पाटील, उर्मिला कदम, सुरेश कदम, दिपाली पाटील, केतन साळगावकर, गोरखनाथ कदम, पिंकी सौदा, सोनाली सोनवणे, स्नेहा थोरात, स्नेहल ओवाल, महेश गुप्ता, रेश्मा कदम, मुकेश गुप्ता, दीपक गुप्ता, केतन म्हात्रे, सुशीला हांडे, चैताली पाटील, अनिरुद्ध जैस्वार व अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे ठाणे जिल्हा अध्यक्ष हरी आल्हाट आणि इतर सहकाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले. महाराष्ट्राच्या विविध भागातून आलेल्या मान्यवरांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन केल्याबद्दल रामजीत ( जितू ) गुप्ता यांचे सर्वांनी भरभरून कौतुक केले.

## उत्कृष्ट कार्यामुळे पोलीस दलाचा सन्मान वाढविला – ॲड. मनोज संकाये

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) – संभाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री धनंजय ढोणे यांनी गेल्या काही महिन्यांत गुन्हेगारीविरोधात केलेल्या प्रभावी कारवाईमुळे कायदा-सुव्यवस्थेला बळकटी प्राप्त झाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक श्री नवनीत कंवत (भा.पो.से.) यांनी प्रशस्तिपत्र देऊन दखल घेत गौरव केला, ही परळीकरांसाठी अभिमानाची बाब आहे. या कार्याच्या पार्श्वभूमीवर परळी येथील सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये मित्र परिवाराच्या वतीने श्री धनंजय ढोणे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. हा कार्यक्रम मंगळवार, दिनांक ७ ऑक्टोबर २०२५ रोजी परळी शहरात पार पडला. या वेळी ॲड. मनोज संकाये म्हणाले की, "श्री धनंजय ढोणे यांनी गुन्हेगारीविरोधात केलेल्या कारवाईमुळे संभाजीनगर परिसरात कायदा-सुव्यवस्था अधिक सक्षम झाली आहे. त्यांच्या कार्यामुळे पोलीस दलाचा सन्मान आणि जनतेचा विश्वास अधिक दृढ झाला आहे असे ते म्हणाले. कार्यक्रमास विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. परळीतील नागरिकांकडून निरीक्षक धनंजय ढोणे यांच्या कार्याचे कौतुक होत असून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी मित्र मंडळाचे शिरीष सलगरे, शिवा बडे ,बालासाहेब चाटे, संतोष कांबळे, प्रवीण रोडे, देविदास मुंडे ,आधी मित्रमंडळाचे सहकारी उपस्थित होते

## श्री दुर्गाप्रसाद मिताराम हटवार यांचा बृहन्मुंबई महानगर पालिका शिक्षणाधिकारी श्रीमती सुजाता खरे मॅडम द्वारे सत्कार.

मुंबई महानगरपालिका शिक्षणाधिकारी श्रीमती सुजाता खरे मॅडम ,उपशिक्षणाधिकारी श्री किर्तीवर्धन किरतकुडवे ,श्री किसन केंकरे ,श्री मुख्तार शाह, नासीर खान द्वारे वर्ष 2024-25 चे महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभागाचे क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक श्री दुर्गाप्रसाद मिताराम हटवार यांचा बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षणाधिकारी कार्यालय करी रोड मुंबई येथे शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जी/उत्तर विभागातील संत कक्कया मार्ग मनपा हिंदी शाळा क्र. 1 धारावीचे महापौर पुरस्कार पुरस्कर्ते आदर्श शिक्षक दुर्गाप्रसाद मिताराम हटवार यांना 2024-25 चा महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभागाचा




क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाला आहे.
दुर्गाप्रसाद हटवार मुंबई महानगरपालिकेच्या शाळेत गोरगरीब मुलांना गेल्या 17 वर्षापासून घडवित आहेत. विद्यार्थ्यांना शिकविण्याबरोबर त्यांना सामाजिक कार्याची सुद्धा आवड आहे. शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील संस्थांशी त्यांची नाळ जुळलेली आहे. गेल्या सतरा वर्षापासून धारावीतील तळागाळातील विद्यार्थ्यांना आनंदमय शिक्षण शिकवत पवित्र कार्य करीत आहेत. मुंबई महानगरपालिका क्षेत्रात दुर्गाप्रसाद हटवार,उपक्रमशील ,सर्जनशील,गणित,विज्ञान, शिष्यवृत्ती मार्गदर्शक व तंत्रस्नेही ,विद्यार्थी पालकांचे प्रिय शिक्षक म्हणून ओळखले जातात.
मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागातून त्यांना वर्ष 2020-21 मधील मुंबई महापालिकेचा प्रतिष्ठेचा आदर्श शिक्षक महापौर पुरस्कार मिळालेला आहे. हटवार यांना शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात जवळ जवळ 20 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून श्री दुर्गाप्रसाद मिताराम हटवार यांना शासनाच्या वतीने सावित्रीमाई फुले राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आला.
आपल्या कामाची जबाबदारी वाढली असेही हटवार म्हणाले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार ८ ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



## हास्यकवी अशोक नायगांवकर 26 ऑक्टोबरला रोझोद्यात



रावेर तालुक्यातील रोझोदा येथील जागृत तीर्थक्षेत्र श्री कामसिध्द मंदिर सभामंडप येथे २६ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या पुस्तक प्रकाशन सोहळ्याला अध्यक्ष म्हणून महाराष्ट्राचे हास्यसम्राट कवी अशोक नायगांवकर उपस्थित राहणार आहेत.

रोझोदा येथील राजेंद्र तुळशीराम चौधरी यांच्या स्वलिखित ‘दिवा तुळशीरामाचा’ कविता संग्रह व स्वलिखित ‘ज्ञानधारा’ लेख संग्रहाचे तसेच श्रीराम मंदिर व कामसिध्द मंदिर विश्वस्त मंडळाच्या वतीने जागृत तीर्थक्षेत्र श्री कामसिध्द महाराजांच्या ‘आख्यायिका पुस्तिका’ प्रकाशन सोहळ्याचे रोझोदा येथील कामसिध्द मंदिर सभामंडप येथे २६ ऑक्टोबर रविवार रोजी सकाळी दहा वाजता आयोजन करण्यात आले असून याप्रसंगी अध्यक्ष म्हणून महाराष्ट्राचे हास्यसम्राट कवी अशोक नायगांवकर उपस्थित राहणार असून अखिल भारतीय संत समितीचे कोषाध्यक्ष, महामंडलेश्वर जनार्दन हरिजी महाराज, मुंबई प्रियदर्शनी शैक्षणिक व सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष, प्राचार्य डॉं. आशीर्वाद जयवंत लोखंडे यांच्याहस्ते पुस्तक प्रकाशन होणार आहे. यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून सावदा येथील ज्येष्ठ लेखक, व्याख्याते प्रा. व. पु. होले. ज्येष्ठ कवी डॉं. अतुल सरोदे, भारत २४ तास न्यूज संपादक संदीप कसाळकर, रोझोदा येथील लोकशिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष रमेश महाजन, श्रीराम मंदिर व कामसिध्द मंदिर विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष विजय महाजन, रावेर येथील साप्ताहिक कृषिसेवक संपादक, प्रकाशक कृष्णा पाटील उपस्थित राहणार आहेत.

राजेंद्र चौधरी हे बोरीवली येथील हरचंद लोखंडे माध्यमिक विद्यालयात पंचवी वर्षांपासून शिक्षक म्हणून कार्यरत असून भारत २४ तास न्यूजचे पत्रकार आहेत.लेखक, कवी, पत्रकार व शिक्षक असलेल्या राजेंद्र चौधरी यांचा स्वलिखित ‘अमृतवेल’ या पहिल्या कविता संग्रहाचे प्रकाशन बोरीवली येथे प्रियदर्शनी शैक्षणिक व सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात अशोक नायगांवकर यांच्या उपस्थितीत प्रकाशन झाले होते. श्री. चौधरी यांचा अमृतवेल हा कविता त्यांच्या अमृता आईच्या नावाने प्रकाशित झाला तर ‘दिवा तुळशीरामाचा’ हा स्वलिखित दुसरा कविता संग्रह वडिलांच्या नावाने प्रकाशित करण्यांचा राजेंद्र चौधरी यांचा मानस आहे.रोझोदा येथील जागृत देवस्थान कामसिध्द महाराजांविषयी विविध वास्तववादी माहिती असून त्याविषयी आख्यायिका पुस्तिका तयार करण्यात आली असून सदर पुस्तिके प्रकाशन देखील यावेळी होणार असल्याची माहिती श्रीराम मंदिर व कामसिध्द विश्वस्त मंडळ व राजेंद्र चौधरी यांनी कळविले आहे.

## नौरोसजी वाडिया महाविद्यालयातील कर्मचारी श्री दिनेश खैरे यांना किर्तीरत्न साहित्य पुरस्कार २०२५

कवी सरकार स्वाभिमानी वाचन मंदिर इंगळी आणि काशिनाथ आव्हाड फिल्म्स प्रोडक्शन अहिल्यानगर आयोजित पर्यटन दिनानिमित्त निसर्ग वैभव कवी संमेलन व पुरस्काराचे आयोजन दिनांक 28 सप्टेंबर 2025 रोजी सकाळी साडेनऊ वाजता करवीर नगर वाचन मंदिर भवानी मंडप कोल्हापूर येथे उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे उद्घाटक प्रसिद्ध ज्येष्ठ साहित्य मा. प्रा. किसनराव कुऱ्हाडे (अध्यक्ष शिवराज कॉलेज गडहिंग्लज), मा. श्री काशिनाथ आव्हाड (प्रसिद्ध चित्रपट निर्माते व अभिनेते, अहिल्यानगर), मा. श्री रामेश्वर दगडू आंबरे (चित्रपट अभिनेते, अकोले), मा. श्री दशरथ दिनकर पाचारणे (चित्रपट अभिनेते) पुणे, मा. श्री श्रीकांत पाटील (साहित्यिक), मा. सौ. सुरेखा अण्णासो वाडकर (कवयित्री), माननीय श्री कवी सरकार इंगळी (ज्येष्ठ कवी ,साहित्यिक), या सर्वांच्या उपस्थितीमध्ये कवी साहित्यिक



श्री दिनेश ताराचंद खैरे यांना राज्यस्तरीय किर्तीरत्न साहित्य पुरस्कार2025 सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.याप्रसंगी निसर्ग वैभव कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यावर्षी पुणे, महाराष्ट्र येथील नामांकित शिक्षण संस्था नौरोसजी वाडिया महाविद्यालयातील कार्यरत कर्मचारी, साहित्यिक, कवी श्री दिनेश ताराचंद खैरे यांना शिक्षा आणि साहित्य यामध्ये उल्लेखनीय योगदानासाठी राज्यस्तरीय किर्तीरत्न साहित्य पुरस्कार 2025 सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

साहित्यिक ,कवी,श्री दिनेश ताराचंद खैरे हे मितभाषी,मृद स्वभावाचे, सेवा कार्यतत्पर,कवी लोकसाहित्य म्हणून सुपरिचित आहेत. सांस्कृतिक, अध्यात्मिक अशा सर्व क्षेत्रात त्यांचा वावर आहे. त्यांची दोन पुस्तके सुद्धा प्रकाशित आहेत. यापूर्वी त्यांना अनेक राज्यस्तरीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांचे अनेक मानसन्मान सोहळे झाले आहेत.श्री दिनेश खैरे यांना मॉर्डन एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त मा. प्रा.श्री सचिन सानप (सर), नोरोसजी वाडिया महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.श्री वसंत चाबुकस्वार(सर), माजी प्रबंधक, श्री राजेंद्र तागडे(सर), डॉ. श्री प्रकाश चौधरी( सर),डॉ. श्री. लक्ष्मण चौधरी (सर), डॉ.श्री अशोक उबाळे (सर) सहसंचालक(उच्च शिक्षण) विभाग पुणे, डॉ. अर्चना बोऱ्हाडे (मॅडम) सहसंचालक (उच्च शिक्षण )विभाग पुणे. श्री अरविंद भागवत सर,श्री माणिक मुंडे सर,श्री बाळासाहेब पोटे सर,श्री विनायक चव्हाण सर,श्री विजय सावरतकर सर,माजी गटशिक्षणाधिकारी श्री ए.बी. पाटील सर,प्रा. सौ संजीवनी पाटील (मॅडम),श्री नामदेव गवळी सर,श्री सुरेश पाटील सर,श्री राजाराम साधले सर,श्री देवदास जामदार गुरुजी,श्री शिवाजीराव हराळे मास्तर, श्री सतीश गोगावले,श्री राम यादव सर,आदींचे मार्गदर्शन लाभले.

## अगस्त इंटरनॅशनल फौंडेशन आयोजित जिज्ञासा २०२५-२६ स्पर्धा आयोजित

सर्वांना कळविण्यात आनंद होतो की अगस्त्य इंटरनॅशनल फाऊंडेशन वतीने जिज्ञासा 2025-26 ही स्पर्धा ऑनलाइन माध्यमातून आयोजित करण्यात येत आहे. एक दशकाहून अधिक काळ यशस्वीपणे राबवली गेलेली जिज्ञासा विदयार्थ्यांमधील समस्या सोडवण्याची कौशल्ये विकसित करण्यासाठी एक प्रभावी व्यासपीठ ठरली आहे. या वर्षीची स्पर्धा दोन विभागांमध्ये होणार आहे

1) विद्यार्थी गट– विद्यार्थी स्थानिक समस्या ओळखून त्या UN शाश्वत विकास उद्दिष्टांशी (SDGs) जोडून नाविन्यपूर्ण उपाय सुचवतील.
2)शिक्षक गट – TLM (Teaching Learning Material) बनवण्याची स्पर्धा विज्ञान व गणित विषयातील महत्त्वाच्या संकल्पना स्पष्ट करणारे शिक्षण साहित्य (TLM) (डी. एड.बी. एड कॉलेज विद्यार्थी शिक्षक गटा तून भाग घेऊ शकतात)

स्पर्धेची वैशिष्ट्ये:
स्पर्धा प्रादेशिक व राष्ट्रीय या दोन स्तरांवर होईल. प्रादेशिक स्तरावरील विजेते विद्यार्थी व शिक्षकांना राष्ट्रीय स्तरावर आपले प्रकल्प/ साहित्य सादर करण्याची संधी मिळेल. हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये समस्या सोडवण्याची क्षमता, चिकित्सक विचारसरणी व जागतिक आव्हानांविषयी जागरूकता वाढवण्यास उपयुक्त ठरेल.शिक्षक व विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग हे या उपक्रमाचे मुख्य वैशिष्ट्य ठरेल.ही स्पर्धा विनामूल्य असून जास्तीत जास्त शाळेतील विद्यार्थी व शिक्षक यांनी यात सहभागी व्हावे. नोंदणी करण्याची अंतिम दिनांक 15 ऑक्टोबर आहे.

नोंदणीसाठी संपर्क साधा:
शुभांगी लोंढे -7588030314
प्रदीप कासुर्डे -7738436449

## सातत्य हा उद्योजकतेचा आधारस्तंभ – प्रा. प्रज्ञा पंडित

“व्यवसायात यश मिळवण्यासाठी केवळ बुद्धिमत्ता किंवा भांडवल नव्हे, तर प्रामाणिकपणा, निष्ठा आणि सातत्यपूर्ण प्रयत्न या तीन गुणांची आवश्यकता असते. हे गुण जोपासले, तर कोणत्याही क्षेत्रात प्रगती निश्चित होते,” असे मत प्रा. प्रज्ञा पंडित यांनी व्यक्त केले. त्या ब्राह्मण व्यापारी सेवा संस्था (बी व्ही एसएस) तर्फे आयोजित “बुधवार मंच” या उपक्रमांतर्गत झालेल्या “कर्म, धर्म आणि उद्यम” या विषयावरील व्याख्यानात बोलत होत्या. या कार्यक्रमाचे आयोजन बी व्ही एसएस चे अध्यक्ष प्रसन्न आत्मसिद्ध, सचिव कौस्तुभ दामले आणि कोषाध्यक्ष सीए चैतन्य दाते यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते. व्याख्यानाचे समन्वयन हेमांगी टिल्लू मुळ्ये यांनी केले, तर विशेष सहकार्य मानस दातार यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष आर्किटेक्ट मकरंद भट, सचिव अमोद घैसास आणि कोषाध्यक्ष सीए चैतन्य दाते या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. या प्रसंगी प्रा. पंडित यांनी उद्योजकतेतील नैतिकता, कर्माची मूल्ये आणि सामाजिक




जबाबदारी यांवरही सविस्तर प्रकाश टाकला. कार्यक्रमाला ब्राह्मण व्यापारी सेवा संस्था चे अनेक पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते..

## अतिवृष्टीच्या परिस्थितीला कवितेच्या श्वासातून केला प्रस्थापित व्यवस्थेला प्रश्न

जीवन गौरव साहित्य परिवार महाराष्ट्र राज्यातर्फे नवोदित कवी-कवयित्रींच्या कविसंमेलनाचे आयोजन एक श्वास कवितेचा या शीर्षकाखाली आभासी तंत्राने करण्यात आले.

संमेलनाचे अध्यक्ष उमेंद्रदादा बिसेन पुणे यांनी “सामर्थ्य लेखनीचे” ही कविता ऐकवून व्यक्त झाले. साहित्य परिवारातर्फे नवोदितांना संधी उपलब्ध करुन देत त्यांचे व्यक्तिमत्व फुलवण्याचे कार्य सातत्याने होत असते, असे प्रतिपादन त्यांनी आपल्या शब्दात केले. कुरखेडा येथील बालकवयित्री विधी बन्सोड हिच्या “तुटक्या काळजाचे” या बहारदार कवितेनंतर यवतमाळहून प्रवासात कविता शिरभाते यांनी “छोटेखानी नेक” ही तर ब्रम्हपुरीहून नरेंद्र ढोले यांनी आईच्या प्रेमावर “वात्सल्य”, पर्यावरणप्रेमी सुमित राठोड नागपूर यांनी “लक्ष आमचे वृक्षलागवडीकडे” तर अतिवृष्टीमुळे मराठवाड्यातील विदारक परिस्थितीचे हृदयदावक वर्णन करतांना शैलेश कडेकर लाखांदूर यांनी “अस्मानी संकट” ही कविता सादर करुन व्यवस्थेला आर्त हाक दिली.

महाराष्ट्र शासनातर्फे आदर्श शिक्षिका म्हणून पुरस्कार प्राप्त भारती शिवणकर गडचिरोली “छळून घ्या संकाटांनो” ही कविता सादर केली. झाडीबोली साहित्य मंडळ भंडा-याचे प्रमुख




कुंजिलाल गोंधळे लाखांदूर “कायचा मराटी मराटी मनता तं जी” या कवितेतून बोली भाषेचा जागर करुन प्रस्थापित व्यवस्थेला जाब विचारण्याचा अचूक प्रयत्न केला. नवोदित कवयित्री तथा कृतीशील शिक्षिका वर्षा पालांदूरकर लाखांदूर यांनी वडीलांप्रती कृतज्ञता व्यक्त करताना “असा माझा बाप” ही कविता सादर केली.

कविसंमेलनाचे सूत्रसंचालन जीवन गौरव साहित्य परिवारचे प्रमुख गणेश कुंभारे यांनी केले. दिनदर्शिकेचे महत्व कवितेतून सांगून झाडीबोलीतील एक कविता “माय माझी सोकावते” ही रचना ऐकवून कार्यक्रमाची सांगता सर्वांचे आभार मानून केले.

# वाचन हा आपला छंद असला पाहिजे : एकनाथ आव्हाड

# अभिजात मराठी भाषा सप्ताह उत्साहात साजरा

ता. 07 मुंबई प्रतिनिधी जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर, मुलुंड (प.), मुंबई- ८०. या ठिकाणी सकाळी “अभिजात मराठी भाषा सप्ताह” निमित्ताने ग्रंथ प्रदर्शन व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून मा. ग्रंथालय संचालक, अशोक गाडेकर साहेब लाभले. त्यांनी त्याचे मनोगतामधून विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व पटवून दिले. अभ्यासा व्यतिरिक्त अवांतर वाचनाचे महत्त्व पटवून देतांना मराठीतील उपलब्ध साहित्य आपल्या जिवनाला बहुआयामी व्यक्तिमत्व बनविण्याकरीता महत्त्वाची भुमिका बजावितात. आपण सर्वांनी मराठी साहित्य वाचले आणि अनुभवले पाहिजे आणि सर्वांना या करीता शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून मा. श्री. एकनाथ आव्हाड (सुप्रसिध्द साहित्यिक, साहित्य अकादमी बाल साहित्य पुरस्कार प्राप्त लेखक) यांनी “वाचन संस्कृती” या विषयावर विद्यार्थी/पालक/वाचक यांना विविध उदाहरण देऊन आपण वाचनाकडे कसे वळले पाहिजे, वाचन हा आपला छंद असला पाहिजे, वाचनातून वैचारीक प्रगल्बता कशी वाढते आणि आपला व्यक्तिमत्त्व विकासाकरीता कसे पोषक आहे याचे अनेक उदाहरणे दिली. सरते शेवटी विद्यार्थी यांना शाळा, शिक्षक आणि वाचन याचा आपल्या जिवनावर कश्या प्रकारे



सकारात्मक परिणाम होता हे पटवून दिले आणि विद्यार्थी व वाचक यांना अंतर्मुख केले.

या कार्यक्रमाकरीता बृहन्मुंबई महानगरपालिका शाळेतील विद्यार्थी मोठया संख्येने शिक्षका समवेत उपस्थित होते. तसेच मा. श्री. के. सी. आर्य, प्रशासकीय अधिकारी, टि वार्ड यांनी सुद्धा आपली उपस्थिती लावून शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थी, स्पर्धा परिक्षेचे विद्यार्थी, वाचक आणि अधिकारी/कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्री. संजय वा. बनसोड यांना २५ वर्ष सेवा पुर्ण झाल्यामुळे मा. ग्रंथालय संचालक श्री. अशोक गाडेकर साहेब यांनी ग्रंथ भेट देऊन सत्कार केला. या संपूर्ण कार्यक्रमा करीता कार्यालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी व विद्यार्थी यांचे सहकार्य लाभले. तसेच कार्यक्रमाचे सुंदर सुत्र संचालन कु.श्रेया (यु.पि.एस.सी. अभ्यास करणाऱ्या विद्यार्थी) ने केले. शेवटी परिसरामध्ये मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करून कार्यक्रमाची सांगता झाली.

# RTO : पदोन्नती रखडली, राज्यातील आरटीओ कर्मचारी संघर्षाच्या पावित्र्यात

मोटार वाहन विभाग (आरटीओ) कर्मचारी वर्गासाठी पदोन्नतीच्या अत्यंत नगण्य संधी होत्या. त्यासाठी सलग सहा वर्षांच्या अथक संघर्षानंतर कर्मचारी संघटनेच्या पाठपुराव्याने दि. २३ सप्टेंबर २०२२ रोजी नवीन आकृतीबंधास शासन मान्यता देण्यात आली. आकृतीबंधाचे आदेश पारित होऊन दोन वर्षांचा कालावधी लोटूनही कर्मचारी वर्गास बदललेल्या आकृतीबंधाचा लाभ देण्यात आलेला नाही. पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती पासून वंचित रहावे लागत असल्याने, संघटनेच्या वतीने गेल्यावर्षी दि. २४,२५ आणि २६ सप्टेंबर २०२४ रोजी तीन दिवसीय "बेमुदत संप आंदोलन" केले होते. त्यानंतरही सरकारने पावले न उचलल्याने आता राज्यातील आरटीओ कर्मचारी सोमवार पासून साखळी उपोषण करणार आहेत. त्यामुळे आरटीओतील काम रखडण्याची शक्यता आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर परिवहन आयुक्त यांच्याशी झालेल्या चर्चेत, पदोन्नत्यांचा मार्ग खुला व्हावा यासाठी आवश्यक ते सेवाप्रवेश नियम एक महिन्याच्या अवधीत शासनाकडून मंजूर करुन घेतले जातील. तसेच कळसकर समितीचा अहवाल देनंदिन कामाचे सुसूत्रीकरण व्हावे यासाठी लागू करण्यात येईल. त्याचप्रमाणे इतर मागण्यांबाबत सहानुभूतीपूर्वक विचार केला जाईल असे आश्वासित करण्यात आले होते. परंतु वर्षभराचा कालावधी लोटूनही एकही प्रश्न मार्गी लागलेला नाही त्यामुळे परिवहन विभागातील कर्मचारी संतप्त आहेत. रिक्त ६६ प्रशासकीय अधिकारी पदांवर एकही पदोन्नती अद्याप दिली जात नाही. तसेच कार्यालयीन अधिक्षक या




पदावरही सेवाप्रवेश नियमाचे असमर्थनीय कारण दाखवून पदोन्नती नाकारली जात आहे. यामुळे कर्मचाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. यासाठी मागील वर्षभर मा. परिवहन आयुक्त तसेच मा. परिवहन मंत्री यांचेकडे बैठक लावून चर्चेच्या माध्यमातून प्रलंबित प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतु वारंवार मागणी करुनही साधी बेठकीची मागणीही मान्य होत नाही. या सर्व बार्बीमुळे संपूर्ण महाराष्ट्रातील आरटीओ कर्मचाऱ्यांमध्ये संतापाची तीव्र लाट उसळली आहे. आरटीओ प्रशासनाचा समस्याग्रस्त कर्मचाऱ्यांकडे पहाण्याचा दृष्टीकोन कमालीचा उदासीन आहे. राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेला अलिकडे दिलेली आश्वासने सुध्दा पाळली जात नाहीत. त्यामुळे परिवहन विभागात कर्मचाऱ्यांच्या भावनांचा उद्रेक झालेला आहे.

# प्रमोद महाजन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शासकीय तंत्र प्रशाला केंद्रात आज ८ ऑक्टोबर रोजी

## उद्योग– संरेखित आणि नवयुगीन अल्पकालीन व्यवसाय अभ्यासक्रमाचा शुभारंभ

अंबाजोगाई (प्रतिनिधी) येथील प्रमोद महाजन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शासकीय तंत्र प्रशाला केंद्र, अंबाजोगाई (जि.बीड) येथे आज बुधवार, दिनांक ८ ऑक्टोबर रोजी दुपारी ३.३० वाजता अल्पकालीन रोजगारक्षम कार्यक्रम (एसटीईपी) अंतर्गत उद्योग - संरेखित आणि नवयुगीन अल्पकालीन व्यवसाय अभ्यासक्रमाचा शुभारंभ देशाचे सन्माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या हस्ते आभासी (डिजिटल माध्यम) पध्दतीने करण्यात येणार आहे. यावेळी श्री.आचार्य देवव्रतजी (राज्यपाल, महाराष्ट्र राज्य.), देवेंद्रजी फडणवीस (मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.), एकनाथराव शिंदे (उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.), अजितदादा पवार (उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, बीड मंत्री.), मंगल प्रभात लोढा (मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, महाराष्ट्र राज्य.), श्रीमती पंकजाताई मुंडे (मंत्री पर्यावरण व दुग्ध विकास, महाराष्ट्र राज्य.) यांची सन्माननीय उपस्थिती राहणार आहे. तर यावेळी मुख्य अतिथि म्हणून महादेव क्षिरसागर (विश्वकर्मा लाभार्थी) हे असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ.नमिताताई मुंदडा (विधानसभा सदस्य, केज) या असणार आहेत. तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून खासदार सौ.रजनीताई पाटील (राज्यसभा सदस्य), खासदार बजरंगबप्पा सोनवणे (बीड लोकसभा), सतिशभाऊ चव्हाण (विधान परिषद सदस्य), विक्रमराव काळे (विधान परिषद सदस्य), प्रकाशदादा सोळंके (विधानसभा सदस्य, माजलगाव.), सुरेशअण्णा धस (विधानसभा सदस्य, आष्टी.), धनंजयभाऊ मुंडे (विधानसभा सदस्य, परळी वैजनाथ.), संदीपभैय्या क्षिरसागर (विधानसभा सदस्य, बीड.), विजयसिंह पंडीत (विधानसभा सदस्य, गेवराई.), विवेक जॉन्सन, भा.प्र.से. (जिल्हाधिकारी, बीड.), जितीन रहेमान भा.प्र.से. (मुख्यकार्यकारी अधिकारी, जि.प. बीड.), नवनीत काँवत भा.पो.से.(पोलिस अधिक्षक, बीड.), ए.बी.ठोंबरे (चेअरमन, आय.एम.सी.अंबाजोगाई.) लाभणार आहे. अशी माहिती देवून या कार्यक्रमाचा लाभ विद्यार्थी, पालक व नागरिकांनी घ्यावा असे आवाहन निमंत्रक डॉ.पी.डी.उखळीकर (जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, बीड) आणि पी.टी.मुने (प्राचार्य /मुख्याध्यापक, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शासकीय तंत्र प्रशाला केंद्र, अंबाजोगाई) यांनी दिली आहे.

## डॉ. रेवती आळवे यांना संत ज्ञानेश्वर श्रेष्ठ शिक्षक पुरस्काराने सन्मानित !!




नुकताच मुंबईत मराठा मंदिर संस्था आयोजित भव्य कार्यक्रमात, राष्ट्रीय अध्यक्ष डॉ शैलेंद्र कुमार शर्मा, डॉ आफताब अन्वर शेख, डॉ शेहनाज शेख, डॉ प्रभू चौधरी, डॉ अलका नाईक, माया मेहता आणि डॉ बाबासाहेब तोरसकर यांच्या उपस्थितीत डॉ उर्वशी पांड्या यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन जेष्ठ समाजसेविका आणि गोरेगाव मुंबई महिला अध्यक्षा तसेच कर्तव्यदक्ष पोलिस मित्र फाऊंडेशनचे सभासद डॉ. रेवती कृष्णा आळवे यांना "संत ज्ञानेश्वर श्रेष्ठ शिक्षक- २०२५ पुरस्काराने" सन्मानित करण्यात आले.

## विक्रम चहाचे संस्थापक रमेशभाई पटेल (भाईश्री)यांचा वाढदिवस साजरा



परळी (प्रतिनिधी) _ विक्रम चहाचे संस्थापक रमेशभाई पटेल (भाईश्री) यांच्या ७६ व्या वाढदिवसानिमित्त दि. ७ ऑक्टोबर २०२५ रोजी घाटनादूर येथील गुरुदास सेवा आश्रम (वृद्धाश्रम) येथे ७६ ब्लँकेट वाटपाचा कार्यक्रम करण्यात आला.दूरदृष्टी, कष्टशील वृत्ती आणि सेवाभावामुळे आज विक्रम चहा घराघरात पोहोचला आहे. आपले संपूर्ण जीवन हे अनेकांसाठी प्रेरणादायी दीपस्तंभ ठरले आहे असे उदगार यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

सदरील ब्लँकेट वाटप कार्यक्रम लालाजी महाराज आणि प्रभाकर हजारे यांच्या हस्ते पार पडला. याप्रसंगी संतोष खेडकर, गोपाळ कंकाळ, विरभद्र जवादे उपस्थित होते. कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन विक्रम चहाचे वितरक संजय सेवलकर यांनी केले.

## मराठवाडा साथीचे संपादक सतीश बियाणी यांना परळीकरांच्या वतीने भावपूर्ण अभिवादन

# अभिवादन सभेत अनेकांनी व्यक्त केल्या आपल्या भावना

परळी/ प्रतिनिधी- दैनिक मराठवाडा साथीचे संपादक सतीश शेठ बियाणी यांचे दिनांक 12 सप्टेंबर रोजी निधन झाले होते. त्यांना अभिवादन करण्यासाठी परळी तालुका व शहर पत्रकार संघाच्या वतीने घेण्यात आलेल्या कार्यक्रमात परळीकरांनी श्रद्धांजली अर्पण केली. तसेच यावेळी उपस्थित मान्यवरासह अनेकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

परळी तालुका व शहर पत्रकार संघाच्या वतीने लोकनेते गोपीनाथराव मुंडे पत्रकार भवन येथे आज मंगळवार दिनांक 7 ऑक्टोबर रोजी दैनिक मराठवाडा साथीचे मुख्य संपादक स्मृतीशेष सतीश शेठ बियाणी यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ पत्रकार व साहित्यिक रानबा गायकवाड होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून भाजपाच्या परळी शहराध्यक्ष उमाताई समशेट्टे, नगरसेवक प्रा. पवन मुंडे, शरद पवार राष्ट्रवादी गटाचे नेते एडवोकेट जीवनराव देशमुख, सुरज बियाणी,सामाजिक कार्यकर्ते अनंत इंगळे, दैनिक परळी प्रहार चे संपादक



राजेश साबणे, ओमप्रकाश बियाणी,

# हज़रत स.अब्दुल खादर उर्फ स. शाहमिरां कादरी र.अ. यांचा 737 वा उर्स थाटात साजरा

त्रुड (प्रतिनिधी) - बीड जिल्ह्यातील माजलगांव तालुक्यात असलेल्या नित्रुड गावात हज़रत स.अब्दुल खादर उर्फ स. शाहमिरां कादरी र.अ. यांचा ७३७ वा उर्स थाटात साजरा करण्यात आला. दिनांक ०३ ऑक्टोबर २०२५ शुक्रवार रोजी रात्री आठ वाजता मुहम्मद मिसबाहुद्दिन आणि मुहम्मद आसेफ यांच्या घरापासून संदल काढून गावात फिरून दरगाहत पोहोचला. दरगाहला चादर ए गुल (गलाफ) चढविण्यात आली. फातेहानंतर भाविकांना प्रसाद वाटण्यात आला. दिनांक ०४ ऑक्टोबर २०२५ शनिवार रोजी रात्री ८ वाजता कव्वाल्यांचा शानदार कार्यक्रम घेण्यात आला. यात कव्वाल सोफी आसेफअली आणि कव्वाला इरम चिश्ती अजमेरी यांनी कव्वाल्या सादर केल्या तसेच बीड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध गायक एम.एम.शेख यांनी प्रथमच कव्वाली गायली. संदल, उर्स आणि कव्वाली चे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुहम्मद मिसबाहुद्दिन, सय्यद आजम पाशा, सय्यद रज्जाक, नासेर खान पठाण, सय्यद फैजुद्दिन, सय्यद रहिम, स.हाकीम, स. जमील, मुहम्मद मुखीद, सय्यद सलिम, मुहम्मद अयाज़ोद्दीन, सय्यद नईम, मुहम्मद इकबाल, मुहम्मद अनीस, मुहम्मद साद, सय्यद आमेर, सय्यद रेहान, मुहम्मद आसेफ, सद्दाम पाशा, सय्यद जुनेद, सय्यद काबातुल्ला, सय्यद रफिक, मुहम्मद मुन्तखबोद्दीन, हारूण पठाण, सय्यद फईम, सय्यद अलीम, मुहम्मद रूकनोद्दीन, अदनान खान, मुजाहेद, मुहम्मद अतीख, सय्यद खदीर, सय्यद अजीम, सय्यद परवेज, मुहम्मद मुजीब, सय्यद इलयास, मुहम्मद निजामोद्दीन, सय्यद मुनीर, सय्यद अहेमद, सय्यद शोयब, सय्यद मसुद, सय्यद हाशीम, मुहम्मद मसीहुद्दीन, सय्यद सद्दाम, शहेबाज खान, सय्यद हुस्न मुबारक, सय्यद आयान, सय्यद नोमान, मुहम्मद उमेर, सय्यद जायेद, सय्यद युसूफ, पाशा आझम, सय्यद मंसुर पाशा, सय्यद सरफराज पाशा, कॉ. दत्तात्र्य डाके, उत्तम मंजु जाधव, कॉ. सुभाष डाके, शेख चाँद शेख खुद्दूस, अशोकराव बोरवाटे, दिपकराव



बोरचाटे, आबासाहेब गायकवाड, कॉ. संदीपान तेलगड, मनोहर तात्या डाके, दिनेश गायकवाड, बंडु डिगांबर राठोड, शरद बोरवाटे, दत्तात्रय वि. डाके, पोपट गायकवाड, उध्दवराव बोरचाटे, शेख शफिक, विकास डाके, प्रताप डाके, रामदिप डाके, कामराज बोरचाटे, नारायण तातोडे, ॲड. अरूण कुलकर्णी, ॲड. अशोक डाके, गोपाळ कुलकर्णी, अर्जन पवार, अशोक पं. पवार, बबन पवार सर, अतीखभाई, समीर बेग, महारूद्र कोथंबिरे, बालासाहेब तेलगड, शेख मजरभाई, दिपकराव घोडके, विजय जाधव, राठोड बाबुराव, उत्तम हाच्चु राठोड, डॉ. शेख खमर, सय्यद निजाम आलम, सय्यद मिर, सय्यद शकील यासीन, नितिन भिमराव पवार, गणपत शामराव पवार, सुखदेव धुले, आप्पासाहेब बडे, बेग फेराज, गोरखनाथ बादाडे, रामभाऊ राऊत, गोरे नवनाथ, भालेकर हनुमंत, तेलगड जनक, हाके बळीराम, शंकर बडे, अशोक तातोडे, बड़े सत्यप्रेम, शेख शायक, अमर बोरघाटे, फुलचंद कटारे, शेख हामिदभाई, शंकर पवार, संतोष डाके, आगे, शिवाजी डाके, गोपाळ हरी पवार, बाळासाहेब तेलगड, बालासाहेब देशमुख, हनुमंत भालेकर, राहुल आवड, पांडुरंग उबाळे, सय्यद रफिक, शेख सादेक, शेख मुखीद, शेख इरफान, शेख युनूस युसूफ, ॲड. सतिष बोरचाटे, अविनाश बोरघाटे, भाऊसाहेब रणदिवे, दादासाहेब सोमा पवार, कांतराव तेलगड, संभाजी शिंदे, सुरेश कापसे, वेग फेरोज, आप्पा आढाव, रामचंद्र आढाव, नरेश बोरचाटे, सय्यद रफीक, शिवाजी धापसे, आवाड विष्णु, शेख नासेर, रामभाऊ पवार, शिंदे ज्ञानोबा, तलाठी मॅडम, भुरके, शेख रऊफ रशिद, सर्पतराव सोनवणे, पार्थराज टाले, संजय तिडके, राघव कुलकर्णी, सुर्यभान गायकवाड, कॉ. रामभाऊ पवार, सुनिल लोंढे, विकास अजय तिडके, विपूल राठोड, रामदास बडे, माऊली तिडके, शेख ज़हीरभाई, बाबासाहेब डाके, बसवेश्वर मोगरकर, शिवाजी तेलगड, भारत लोंढे, स्थागत डाके, अशोक गायके, शिवाजी बडे, शामराव राठोड, विजय पवार, गजानन डाके, काशीनाथ राठोड, भगवान राठोड, स. हादीस, अर्जुन डाके, राजेभाऊ डाके, एकनाथ हाके, शंकर डाके, सुग्रीव करपे, राजेभाऊ पवार, सोमनाथ मुंडे, पांडुरंग आवाड, भानुदास आवाड, रंगनाथ शिंदे, गौतम शिंदे सर, गजानन मिरान, दता घुले, शिवाजी धापसे, शिवाजी राऊत, शेख शाकेब, समीर बेग, बाबुलाल पवार, शेख अय्युब, शेख मुसा, शेख महेबुब युनुस, शेख रऊफ, सुनिल गायके, गणेश गिराम, शेख अतीख, शेख रहिम, शेख विखार आदींनी परिश्रम घेतले.


This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com